
॥ श्री सप्तशृंग निवासिनी देव्यै नमः ॥

पब्लिक ट्रस्ट नं ओ-४६९

**श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट**

सप्तशृंगगड, ता.कळवण, जि.नाशिक - ४२३५०१(महाराष्ट्र)
**मुख्य कार्यालय:** (०२५९२) २५३३५१, जनसंपर्क कार्यालय : २५३२४९
**नाशिक कार्यालय:** खरबंदा पार्क, जानकी प्लाझा, द्वारका, नाशिक - ४२२०११
**संकेतस्थळ:** www.saptashrungi.net
**ई-पत्ता:** saptashrungitrust@gmail.com



Public Trust No. A-469

**SHREE SAPTASHRUNG NIWASINI DEVI TRUST**

Saptashrung Gad, Tal. Kalwan, Dist. Nashik - 423501 (Maharashtra)
**Main Office:** (02592) 253351, Public Relation Office : 253249
**Nashik Office:** Kharbanda Park, Janki Plaza, Dwarka, Nashik - 422011.
**Website:** www.saptashrungi.net
**E-mail:** saptashrungitrust@gmail.com

सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके । शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ॥

जा.क्र.: दिनांक :    /    /२०

प्रेस नोट

श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड तात्काळ प्रसिद्धीसाठी

विषय : अतिवृष्टी, ढगफुटी सदृष्य पाऊस तसेच घाट मार्गावर दरड कोसळण्याच्या हवामान खात्याच्या प्राप्त इशाऱ्याच्या अनुषंगाने मा. प्रांताधिकारी, कळवण यांनी नांदुरी-सप्तश्रृंगगड घाट रस्ता दिनांक ७ जुलै ते ९ जुलै पर्यंत बंद ठेवण्याचा आदेश पारीत केल्याच्या पार्श्वभूमीवर, उपरोक्त तीन दिवस श्री सप्तशृंगी माता मंदिर सुध्दा भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय सदर न्यास मंदिर प्रशासनाव्दारे घेण्यात आला असल्याने भाविकांना सहकार्याचे आवाहन.

नाशिक जिल्ह्यात भारतीय हवामान विभागाने अतिमुसळधार पाऊस तसेच काही भागात ढगफुटीसदृश्य तसेच दरड पडण्याची संभाव्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली असून, या पार्श्वभूमीवर मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी पत्रकार परिषद घेऊन जिल्ह्यात आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना जाहीर केल्या आहेत. तसेच मा. मुख्यमंत्री महोदयांनीही नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे व अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन केले आहे. प्रशासनाने श्रीक्षेत्र सप्तशृंगगड परिसरातील संभाव्य धोका लक्षात घेऊन श्री सप्तशृंगी माता मंदिर बंद ठेवण्याची सूचना केली आहे.

सदर परिस्थितीचा विचार करून श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टतर्फे सर्व भाविकांना कळविण्यात येते की, दिनांक ७ जुलै २०२६ रोजी श्री सप्तशृंगी माता मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी पूर्णपणे बंद केलेले आहे. तदनंतर दि. ०६ जुलै, २०२६ रोजी मा. सहा. जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळवण यांचे प्राप्त शासकीय आदेशानुसार नांदुरी ते सप्तशृंगगड घाट रस्ता हा वाहतुकीसाठी हा भाविकांच्या सुरक्षेसाठी बुधवार, दिनांक ०८ व गुरुवार, दिनांक ०९ जुलै २०२६ रोजी प्रवासासाठी संपूर्णतः बंद करण्यात आलेला आहे. पर्यायी सदर कालावधीत श्री भगवती मंदिर भाविकांना दर्शनासाठी संपूर्णतः बंद असणार आहे. हा निर्णय भाविक व नागरिक यांच्या जीवित व सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच आपत्ती

Scanned with OKEN Scanner

व्यवस्थापनाच्या अनुषंगाने घेण्यात आलेला असून, सर्वांनी प्रशासनास व श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्टला सहकार्य करावे, ही नम्र विनंती आहे.

सर्व भाविकांनी सदर कालावधी दरम्यान श्रीक्षेत्र सप्तशृंगगड येथे येण्याचे टाळावे, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच जिल्हा प्रशासन व श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट यांच्याकडून वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचेच पालन करावे. अशी सूचना अध्यक्ष, श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड तथा धर्मदाय सह आयुक्त -१, नाशिक व मा तहसीलदार तथा विश्वस्त, श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगगड यांनी केले आहे.

**प्रति माहितीसाठी सविनय:**

सर्व संबंधित प्रशासकीय, निमशासकीय विभाग व त्यांचे कार्यालये तसेच स्थानिक ग्रामपंचायत कार्यालय, सप्तशृंगगड

07.07.2026

तहसिलदार कळवण

Scanned with OKEN Scanner